REVIEW OF RESEARCH

# गोर बंजारा समाजातील विवाह संस्कारातील लोकगीतांचे सांस्कृतिक अध्ययन

श्री.राजकुमार तुकाराम राठोड

रीसर्च स्कॉलर
सहशिक्षक, एम.ए.एम.एड् सेट (शिक्षणशास्त्र) जि.प.प्रा.शा.लऊळ क्र.१ ता.माजलगाव जि.बीड महाराष्ट्र

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



**सारांश :**

गोर बंजारा समाजातील विवाह संस्कारातील लोगगीतांचे सांस्कृतिक अध्ययन या संशोधनातून करण्यात आले. गोरबंजारा समाजातील विवाह संस्कारात लोकगीतांना महत्वाचे स्थान आहे. विवाह संस्कारातील लोकगीतांच्या माध्यमातून विवाह पध्दती, परंपरा, प्राचीन सांस्कृतिक इतिहास याची माहिती होते. सगाई पासून हवेली पर्यंत लोकगीतांचे अवलोकन या संशोधनातून करण्यात आले. गोर बंजारा समाजातील विवाहसंस्कारातील सगाई, घोटा, साडी ताळणो, वदाई, मंडेवडो, वेतडून भार काडेरो, वेतडून वाट लगायरो, लेरिया, वेतडू आव जण, कोतळो घरेम लेंळो, टिको लगाडेलो, वायार हांगोळी, वेतडूर चोटीर पाणी पिणो, डोरणं बांधेरो, वाया लगांळो, सप्तपदी, हवेली अगोदरचे गीत, हवेली, ढावलो यामधील लोकगीतांतून हास्य, व्यंग, हर्ष, करूण रसनिर्मिती उत्कृष्ट होते. ढावलो यामध्ये करूणरस उच्च पातळीचा असून भल्या भल्यांच्या ऱ्हदयाला पाझर फोडतो. डोळ्यातून अश्रु वाहू लागतात. गोर बंजारा समाजातील विवाह संस्काराची माहिती व्हावी. विवाह पध्दती, प्राचीन रूढी व परंपरा, लोकगीतांचे सांस्कृतिक अध्ययन व्हावे. या उद्देशाने हे संशोधन करण्यात आले. हे संशोधन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनाचा वापर करण्यात आला. मुलाखती, स्वानुभव, संदर्भग्रंथ, नियतकालिके, रिसर्च जर्नल्स, शोधप्रबंध, वर्तमानपत्रे, मासिके इत्यादी साधनाचा वापर केला. सदर संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक पध्दतीचा वापर करण्यात आला. गोर बंजारा समाजातील विवाह पध्दती, रूढी, परंपरा, लोकगीतांचे सांस्कृतिक ज्ञान अवगत झाले. नवरी मुलगी यांच्या मनातील भाव, करूण रस याने भल्याभल्यांच्या ऱ्हदयाला पाझर फोडला व डोळ्यातून अश्रू वाहू लागले. जीवनशैली लोकजीवन विवाहसंस्कारातील लोकगीतांचे सांस्कृतीक ज्ञान प्राप्त झाले.

**प्रस्तावना :**

गोर बंजारा समाजातील विवाह संस्कारात लोकगीतांना खूप महत्व आहे. लोकगीताविना विवाहस्कांर अधूराच असतो. विवाहात विविध प्रसंगी त्यासंबंधीचे गीत तांड्यातील स्त्रीया, पुरूष, नवरी मुलगी गाते. या गीतांमध्ये व्यंग, हास्य, करूणा इत्यादी रस कुटकुटून भरलेली आहेत. सगाई संबंधी गीत गाऊन सुपारी फोडली जाते व सगाईची रसम पूर्ण करतात. घोटा ही विवाहसंस्कारातील प्रथम विधी आहे. कुंवारे मुले खसखस, सौंप, काली मिर्च, गूळ, काठवटमध्ये ठेवूण ढाकणीने गाणे म्हणत घासतात. हास्य व व्यंग रसातून उपस्थितांचे मनोरंजन होते. साडी ताळणो मध्ये रात्री रंगारी साडी चढवितात त्यानंतर सकाळी बंजारा प्राचीन वेश साडी काढून विधीपूर्वक गाणे म्हणत म्हणत चढविले जाते. वदाई डाग हा वर मुलगा व त्याचा लहान भाऊ याच्या डाव्या दंडावर दिला जातो.गुरूबाबाचा मंत्र सात वेळेस म्हणेपर्यंत गुरूबाबाचा मंत्र म्हटला जातो. दोन घोंगडी व त्यावर कळस चढवून नवऱ्या मुलाचा मंडेवडो उभा केला जातो. स्त्रीया गाणे म्हणत म्हणत नवऱ्या मुलाला बाहेर काढतात. वेतडून वाट लगातेवेळी स्त्रीया वराला गीताच्या माध्यमातून उपदेश देतात. आई, वडील, काका, काकू, बहिण इ.नातलगांना विसरू नकोस. वर मुलासोबत लेरिया सोबतीला पाठविला जातो. वेतडू आव जवा नवरी मुलगी आईजवळ मासे जसे जाळात अडकतात तशी तुझी बेटी अडकली आहे. अशा पध्दतीने ढावलो करून रडते. नायकाच्या घरी कोतळो येतो त्यानंतर कोतळो घरात घेतला जातो. टिको लगाते वेळी परक्या घरच्या हळदीचा टिळा लावू नको म्हणून नवरी मुलगी भावाला विनवणी करते. ढावलो मध्ये करूणा रस एवढा भरलेला असतो की सर्वांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागतात. नवरी मुलीला आंघोळ घालतानाचे गीत, वेतडूर चोटीर पाणी पिणो यावेळी गीत गायले जातात. डोरणं बाधताना नवरी मुलगी ढावलोमधून सांगते सोन्याच्या साखळीने बांधली तर बांधल्या गेली नाही पण कच्च्या धाग्याने पंचमंळीच्या हाताने बांधलेली डोरणं पक्की बांधल्या गेली. मी माझे वचन

LBP PUBLICATION

पूर्ण करीन. गोर बंजारा विवाह वडल्या गोत्र व्यक्तीद्वारा संपन्न करण्याची प्रथा होती परंतु बदलत्या काळानुसार जादा तर ठिकाणांवर ब्राम्हणाद्वारा ही विवाह करून घेतात. सप्तपदी च्या वेळी प्राचीन विवाह पध्दतीत दोन मूसळ गाडले जातात. एक छोटा मुसळ व दुसरा मोठा मुसळ गाडले जातात, कोडी इत्यादी साहित्य असतात वर मुलगा व नवरी मुलगी मुसळाभोवती सात फेरे घेतात. यावेळी नवरी मुलगी गीतांतून पंचाना, नातलगांना, तांड्यांना स्मरते व शेवटची दुल्हा माझा झाला असे वचन देते. गोर बंजारा समाजाच्या विवाहसंस्कारात हवेली ला खूप महत्व आहे. गोरबंजाराचे मूळ सिंधू संस्कृतीत सापडते. हरप्पा नगरी, (हडप्पा), मोहना नगरी (मोहेंजोदारो) संबंधित असल्याचे दिसते. माझ्या नायक बापूची हवेली (नगरी) वडासारखी वाढ, लिंबासारखी झोका घे, उंबरासारखी फैल आणि हिरव्या गवतासारखी हिरवीगार राहा. अन्न धान्यांनी भरलेली, सोने, चांदी, दूध, तूप, गहू, गूळ मुबलड, संपन्न अशी नायक बापूची हवेली आहे. हवेली (नगरी) तूझी अशीच भरभराट होऊ दे. अशी ढावलोतून हवेली म्हणते व कुंवारी कन्याचा तुला आशीर्वाद आहे. असा आर्शीवाद देते. शेवटी जाते वेळी आई, वडील, बहीण यांचे गळो पकडन ढावलो म्हणते. बाबा तुम्ही मला शिकवण द्या. तुमची शिकवण ऱ्हदयाच्या गाठीने बांधेन, तुम्हाला माझी शिकायत येऊ देणार नाही. असे वचन देते. गोर बंजारा समाजातील विवाह संस्कारातील लोकगीतांतून व्यंग,हास्य, हर्ष, करूणा इत्यादी रसांची निर्मिती उच्च पातळीची होते. गोर बंजारा समाजातील विवाह पध्दतीचे ज्ञान व्हावे, आई, वडील, नातलग, नवरी मुलगी यांच्या मनातील भाव कळावेत, प्राचीन लोकगीतांची माहिती व्हावी, ऱ्हदयद्रावक करूणा रस अनुभवता यावा, गोरबंजारा समाजातील विवाह संस्काराचा सांस्कृतिक प्राचीन इतिहास अवगत व्हावा. या अनुषंगाने गोर बंजारा समाजातील विवाह संस्कारातील लोकगीतांचे सांस्कृतिक अध्ययन या संशोधनातून करण्यात आले.

हिंदी धर्मशास्त्रात १६ संस्काराचा उल्लेख करण्यात आला आहे. सर्वसामान्यपणे गोर बंजारा समाजात ३ संस्कार महत्वाचे मानले जातात. विवाह, जन्म व मृत्यू, हिंदू विवाहाची संकल्पना स्पष्ट करताना आर.एन.मुखर्जी म्हणतात, ''काही धार्मिक संस्काराच्या साह्याने समाजाने मान्यता दिलेली स्त्री पुरूषांचे विधीवत मिलन म्हणजे हिंदू विवाह होय.'' विवाहाचे तीन मुख्य उद्देश आहेत. धर्मकार्य, पुत्रप्राप्ती व रती. गोर बंजाराच्या विवाह पध्दती, विवाहाचे विधी, विवाहातील गाणी वैशिष्ट्यपूर्ण आहेत. बंजारा समाजातील लोक विवाह संबंध जुळविण्यापूर्वी जाती, उपजाती, कूळ, पाडा इत्यादीचा विचार करतात. एकाच कुळातील व्यक्ती सगोत्र समजल्या जातात. राठोड - पवार, राठोड - चव्हाण, पवार - चव्हाण, जाधव - चव्हाण,राठोड - जाधव, जाधव - पवार अशी विषम आडनावे असणाऱ्या मध्ये विवाह संबंध प्रस्थापित होतात.

आतेभाऊ - मामेबहिण, मामेभाऊ - आतेबहिणचे विवाह बंजारा समाजात होतात. पण सगोत्र विवाहाला सक्त विरोध आहे.

गोर बंजारा समाजात विवाह संस्कार मध्ये प्रामुख्याने सर्व वेळी गीत गायले जातात. कोणतीही विधी गीताविना पूर्ण होऊ शकत नाही. विवाह पध्दतीवर राजस्थानी संस्काराचा प्रभाव स्पष्ट होतो. यासंबंधी डॉ.मनोहर शर्मा लिहितात की, ''राजस्थान तो लोकगीतों का रत्नाकार है | यहाँ अगणित लोकगीत है | साथ ही उनमे रूप तथा विषय की दृष्टी से वैविध्य भी है | इसी प्रकार विवाह के गीतों की संख्या भी काफी बडी है | वैवाहिक आयोजन से संबंधित एक भी ऐसा दस्तूर नही, जिसके विषय मे एक तथा अनेक गीत हो | सभी परंपराएं गीत गाकर मांगलिक रूप से निभाई जाएगी है |''

## १) सगाई

पंच पंचायत राजा भोजेर सभा
भाईन सग पचारे जगत
दम तो दिया, दिया मलाख्यात
ताटेर थिगळी, जळेर लोटा

तळ कसंळ, जळ कसंळ
कसळ भामियारी वाट
कटवा बेटे चार, सगा बेटे चार
भाई सभा आपळ, से कसळ छं ?

पंच मंडळी पंचायत मध्ये बसत, लदेणी ची वखरा, गुंणी म्हणजे ताटेर थिगळी, पाणी भरलेला लोटा म्हणजे जळेर लाटा सर्व गोत्राची ही सभा आपण सर्व खुशाल आहात, अशी खुशाली विचारत सभेतून उत्तर येत, कसळ छं, कसळ छं, खुशाल आहोत, खुशाला आहोत,

**क्षेमकुशल**

सुकसुकाट सुपारिया, गंगन मंगन रीडोर, तम समंदर हाम मांछळा, तम हाम करा कल्लोळ. धोळो घोडो हांसलो, खुंटी टंगो लगाम, सगाती सगा मळगे, दसदन करदा मुक्काम. डुंगर थे जब दूर थे, आब हो गई पहचान, टाकी लागी प्रेम की, हिरा निपजे खान. हिरा, हिरा काई कोय, हिरा जगमे दोय. एक हिरा समंदरमे वस, एक मातार गोदेमा होय. सोनेरी थाळी, रूपेरी वाटी सगाती सगा मळगे सीतल व्हेगी छाती.कसळं पूछणो.

सुपारी फोडून आनंदी आनंद झाला. तुम्ही समुद्र आम्ही मासे तुम्ही आम्ही भांग घेऊन कल्लोळ करू. पांढरा घोड्याची लगाम खुंटीला टांगून सोयरे सोयरे मिळून दहा दिवस मुक्काम करत. डोंगरात होते तेव्हा दूर होतो आता ओळख झाली. प्रेमपूर्ण संबंध प्रस्थापित करू. हिरा, हिरा म्हणता हिरा जगात फक्त दोनच आहेत. एक समुद्राच्या शिंपल्यात व दुसरा आईच्या कुशीत. सोन्याची थाळी, चांदीची वाटी सोयरे सोयरे मिळून छातीत ठंडक मिळाली. खूप आनंद झाला.

तुम्ही खुशहाल आहात का | हां कसळ छं. हो खुशाल आहोत. पंच मंडळी सुपारी फोडतात व आनंद साजरा करतात.

### सगाई संबंधी गीत

सुपारी फोडल्यावेळी सगाई संबंधी बंजारा स्त्रीया गीत गातात.

राम राम समदी सगाई व्हेगी काईं रे ?
राठोडेरं छोरी पसंद व्हेगी काईं रे.
सपारी फोडेरी चाली काईं घाई रे
याडी बेटी दोई घळी रोव बाईये
पराये पती यारो धन व्हेगी बाईये.

गाण्यातून स्त्रीया इवाईला नमस्कार घालतात सोयरीक झाली काय ? असे विचारतात. राठोड गोत्राची मुलगी पसंद आली का ? विचारतात. सुपारी फोडून रिश्ता पक्का झाला. आई व नवरी मुलगी खूप रडत आहेत. मुलगी परक्या पतीच धन झाली आहे.अशा प्रकारे स्त्रिया गाणे म्हणतात.

### रंग छिडकना

पंच पंचायत राजा भोजेर सभा
भाई न पचारे जगत, एकेती एक सवाई |
लक लक तू परवाना भेजो बाडत दरबार
खोलू तो कस्तुरी, तोलू तो पुरी ज पुरी |
हो रे हो नायक, डूंगर थे जब दूर थे
अब निकळी पंचाळ, तळी आगो पखेडा

बंजारा लोक लदेणी व्यवसाय करत असल्याने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जावे लागे. भेटी गाठी जास्त होत नसत. एखाद्या मुलीचे लग्न झाले तर ती मुलगी पुन्हा भेटेलच असे नाही. काही वर्षानंतर भेटली तर तो योगायोगच असे. पंच मंडळी सभा भरवत. जगातील सर्व आपले गोत्र बाडत दरबारात परवाना पाठविला. खोलला तर कस्तुरी, तोलला तर पुरी ज पुरी हो रे हो नायक, डोंगरात होतो तेंव्हा दूर होतो आता ओळख निघाली आहे. सुपारी फोडण्याचा कार्यक्रम झाल्यावर रंग छिडकून सगाईची रसम पूर्ण करून सोयरीक जमवित. सोयरीक झाल्यावर त्यांचे लग्न लावून दिले जात.

### २) घोटा

विवाह संस्कारातील प्रथम विधी म्हणजे घोटा होय. तांड्यातील स्त्री पुरूष वरपक्षाच्या घरी जमतात. ही विधी नेहमी रात्री जेवणानंतर पार पाडली जाते. खसखस, सौंप, काली मिर्च, गूळ काठवट मध्ये ठेवून ढाकणी ने घासून कुंवारे मुले खालीलप्रमाणे गाणे म्हणत बारीक करतात. याला घोटा घोळणे म्हणतात. हा घोटा घोळते वेळी खालील गीत म्हणत म्हणत कुंवारे मुले घोटा घोळतात.

साजनियारो घोटाज घोळे
साजानियारी साडीज तांळे
कसो करूरे भगवान
मोईना साजे नरत साजेना.
साजत हाय पण समजत नायं
हासती घुंघट खोल
मोईना साजे नरत साजे ना.
मारे गळेरो लाकीट घाती मळेनी.
मारे हातेरी घडी घाती मळेनी.
तारे माते रो मंदिल मन दिजोरे,
मारे माते रो मंदिल घाती मळेनी.
तारे हाते रो छला मन दिजोरे,
मारे हातोरे छला घाती मळेनी.
तारे कानेरो कनिया मन दिजोरे,
मारे कानेरी कनिया घाती मळेनी.
तारे गळेरो लाकीट मन दिजोरे,
तारे हातेरी घडी मन दिजोरे,

### व्यंगात्मक -

हारो हारो रे घंळक्या हारो रे
ओ घळक्यामं नायक बेसियरे
ओन लंगडी घोडी शोभीयरे
हारो हारो रे घळंक्या हारो रे.

हास्य व व्यंग गीतातून पुरूष - स्त्रीया एकमेकांवर गीतांतून प्रहार करतात व त्यातून उपस्थितांचे मनोरंजन होते.त्यानंतर स्त्रीया रात्री बऱ्याचवेळापर्यंत लोकगीतांचे गायन करतात.

### ३) साडी ताळणो

साडी तो ताळो रे वीरा
समो छ ये मारो बापूये
नांदगडेरी साडलिये
समोछ ये मारो काकाये
नांदगडेरी साडलीये

कुंवाऱ्या नवरी मुलीचे सुरूवातीला हातामधील बलिया हार पेहराव इत्यादी वेशभूषेचे दागिने काढत. पाटावर नवरी मुलीला घेऊन जात. त्यानंतर रंगारी साडी चढवित. रात्रभर ती साडी राहू देत. त्यानंतर सकाळी आंघोळीनंतर साडी ऐवजी बंजारा पेहराव घालण्यात येई. बंजारा प्राचीन वेश साडी काढून विधीपूर्वक गाणे म्हणत म्हणत चढवितात.

### ४) वदाई

वर मुलगा आणि त्याचा लहान भाऊ याला वदाई डाग देणे अनिवार्य मानले जाते. सूई गरम करून गुरूबाबाचे मंत्र ७ वेळेस म्हणेपर्यंत सूई गरम होते व दोघांना डाव्या हाताच्या दंडावर चटक्याने डाग दिला जातो, त्याला वदाई डाग म्हणतात.

**गुरूबाबाचा मंत्र**

कोळी आव, कोळी जाव
कोळी माई, जग समावं
धोळो घोडे हासलो
पातळीया आसवार
मुंगे आवडा मोगरा
तल्ली आवडी तलावडी
माईज पूजा माईज पाती
माईज पूजण हार
साम कर सत कर
गुरूबाबा सदा सदा |

पांढरा घोडा आहे आणि त्या घोड्यावर सवार होणारा दुबळा पातळसा आहे. तो या घोड्यावर येत जात राहतो. त्याच्याजवळ मुंग सारखा तत्व साधन आहे. ज्याच्या साहाय्याने तो सृजनशीलताच्या प्रक्रियेला गती देतो. सृजनशीलतेत सूक्ष्मता आहे. या सूक्ष्म सृजनशीतेतच तो भोजन करतो. याला केवळ गुरूबाबा चे ज्ञान ही समजू शकते. जे सदा अमर आहे.

ब्रम्हचर्य अवस्था संपवून गृहस्थाश्रमात प्रवेश मिळवून देणारा अचूक विधी म्हणजे वदाई होय. या विधी वेळी सर्वप्रथम आराध्य देवतांची पूजा केली जाते. त्यानंतर वर आणि त्याच्या लहान भावाला सूई तापवून डाग दिला जातो. वरील गुरूबाबाचा मंत्र सात वेळा उच्चारला जाईपर्यंत सूई तापविली जाते. वर मुलांच्या व त्याच्या लहान भावाच्या हाताच्या डाव्या दंडावर सूईच्या डाग दिला जातो.

### ५) मंडेवडो

तारे बापेरो मंडेवडो हार कियो रे लाल , तारी तोरंळ बडी चलकोडी रे लालं.

मंडेवडो दोन घोंगडी व त्यावर कळस चढवून नवऱ्या मुलाचा मंडेवडो उभा केला जातो. त्याखाली सकाळी नवऱ्या मुलाला बाहेर काढून त्याखाली बसवितात.

### ६) वेतडून भार काडेरो

झुंडीन झुंडाळी तारी कोथळी रे लाडा
बापेरो बेटा एकलो निकलो रे लाडा
बापेरो बेटा भाई रो भतिजा
एकलो निकलो रे लाडा

झुंडी झुंडाळी ने सजविलेली तुझी कोथळी रे मुला. बापाचा लेक भाईचा भतिजा एकटाच निघाला आहे. गाणी म्हणत म्हणत स्त्रीया नवऱ्या मुलाला बाहेर काढतात.

### ७) वेतडून वाट लगायरो

उंडो तो खोळा, डुंगर पपैया बोल
बाप तो जीव लाडा तारी रे वाट
यूं कू आंवू बापे लाडा लागी ससरेरी आस,
याडी तो जीव लाडा तारी रे वाट
यूं कू आंऊ भा वडेली लागी सासूरी आस.

या गीताच्या माध्यमातून स्त्रीया वराला उपदेश देतात. हे वीर युवा, तू जेथे लग्नाला जात आहेस तेथे फार खोल दरी डोंगर आहे. तुला मोह घालणारी मैना तेथे गात आहे. त्या जागी तूला वश करण्यासाठी तुझी प्रतिक्षा करीत मैना बसली आहे. तुझे आई वडील सतत तुझी वाट पाहत आहेत. सासू सासऱ्याच्या प्रेमात तू वाहून जाऊ नकोस. तू असे म्हणू नकोस की, मी असा कसा येऊ, मला तर सासरा अधिक प्रिय आहे. त्यानंतर आई, भाऊ, बहिण, काकू इत्यादी नातलगांची संबोधने येतात. या प्रकारचा उपदेश प्रत्येक तांड्यांची स्त्रीया देतात. कारण त्यांना भिती वाटते की जन्म दिलेल्या मातापित्यांना तो विसरू नये.

### ८) लेरिया

नवऱ्या मुलासोबत लेरिया सोबतीला पाठविला जातो.

लेरिया लेरिया, सपारी फेरिया
लेरियार खींच लावू दोई खरीयाँ
लेरिया, लेरिया, लेरिया,
हम घर चाले.
लेरियार खेचो खरिया,
हम घर चाले.
तांब तंबोळो लोटा
हाम घर चाले.

अशा प्रकारे व्यंग्य गीत स्त्रीया लेरियाबाबत गातात व नवऱ्या मुलाला वाट लावून घरी परत येतात.

**९) वेतडू आव जण**

या, ए दोंजळा कुळं आये या.
या, आंगेरो याडीरो जायो वीर ये या,
या, लारेरो परदेशी पती आये या.
या, पतीयारे मात मोळीयाए या,
या, पतीयारे खांद बरचिए या.
या, पतीयारे काक झोरणांए या.
या, काळो कुंडो नीर भरो या
या, वोम राळो झिंबऱ्या जाळ ए या
या, वोम फंदाई नानी मोटी माचळी
या, जुंतारी बेटी फंदाई या.
या, काळे खेतेम सरळी, वरळी बंबोळी ए या,
या, बंबोळी न लागे काळे पिळे फुलडाए या
या फुलडा कलमाव जू तारी बेटी कलावए या.

ये आई, दोघे जण कोण आले. आई पुढील लेरिया व मागील परदेशी पती आला आहे. आई पतीच्या डोक्यावर पगडी, खांद्याला बरची, काकात झोरिया आहे. आई कुंडात स्वच्छ पाणी भरलयं, त्यामध्ये जाळ टाकलयं आणि त्या जाळात लहान मोठ्या मासळ्या अडकल्या. तशी तुझी बेटी अडकली आई. आई काळ्या शेतात सरळ, वाकडी बाभळी, त्या बाभळीला काळे पिवळे फूल लागले. ते फूल गळून पडले. जशी तुझी बेटी तुटून पडली आहे फूल जसे कोमेजत आहेत तशी तुझी बेटी झुरत आहे, कोमेजत आहे. असे ढावलो म्हणत मुलगी आपल्या भावना आईजवळ ढावलो रडण्यातून व्यक्त करते.

**१०) कोतळो घरेम लेंळो**

भूरिया लावस तो घर आरे,
नितो मारे आंगण मत आरे.
हासली लावस तो घर आरे,
नितो मारे आंगण मत आरे.
लोवडी लावस तो घर आरे,
नितो मारे आंगण मत आरे.

भूरीया आणलस तर घरी ये नाही तर माझ्या अंगणात येऊ नकोस. हासली आणली असेल तर घरी ये नाहीतर अंगणात येऊ नकोस. लोवडी आणली असेल तर घरी ये नाही तर अंगणात येऊ नकोस. नायकाच्या घरी कोतळी आल्यावर साखरेचे गाठोडे किंवा चुर्मा व एक रूपया बंजारा नायकणं व इतर स्त्रिया गाणे म्हणत म्हणत सोडतात व साखर किंवा चुर्मा इतरांच्या हातावर वाटतात. नायकाच्या घरी चहा पान करतात.वरील गीत म्हणत बंजारा स्त्रीया नवऱ्या मुलाला नवरी मुलीच्या घरी घेऊन जातात.

**११) टिको लगाडेरो**

हळदी टिका लावू नये यासाठी नवरी मुलगी आपल्या भावाला विनवणी करते.
मत घसो रे वीरा, आपणे नायक बापूरे आंगळेम, पराए घरेरी पराए राळेदी,
फिकीज हळदीरो टीको | हिय्याँ
कुकूज चंदनेरो धकदेन झेल लूरे वीरा, न झेलू फिकीज हळदीरो टीको, हियाँ
बापरे याडीरे हालकारे, बापूरे दलकारे, उटे कपडे रे मारवाडी वीरा
सो हाक मारू तो न गोळा हीए वीरा, एकीज हाकेमं गोळा हेगे वीरा,
एक घडी लागे वत सो घडी लगाडो वीरा, घडी एक होटो बेस जावो वीरा, आँ हियाँ
मातेन मंदिल कबूल करू वीरा, घडी एक होटो बेस जावो वीरा हिय्याँ.
दसी आंगळीरो अरदास करू वीरा, बंदि लोवडी रो खोळो मांडू वीरा
घडी एक होटो बेस जावो वीरा, आँ हिय्याँ,
थाळी लेरा लेरी वीरा, दिवो झकोळो खारो वीरा, घडी एक होटो बेस जावो वीरा, आँ हिय्याँ

वडीलाच्या अंगणात परक्या घराच्या हळदीचा टिळा लावून मला पराई करू नकोस वीरा. हे वीरा, वडीलाच्या घरांचा चंदन कुंकवाचा टिळा मी झेलेन पण परक्या घराचा फिक्या हळदीचा टिळा मी झेलणार नाही. एक घडी लागेल तेथे शंभर घडी लाव. तुझ्या डोक्यावर मंदिल, गळ्यातील लॉकेट कबूल करते पण तू वापस बसून जा. हा फिक्या हळदीचा टिळा लावू नको. दहा बोटांनी हात जोडून तुझी अरदास करते. तुझ यासमोर पदर पसरून भीक मागते तू वापस बस. वीरा थाळी लेरा घेत आहे. दिवा झकाळो खात आहे, तू वापस बस. मला परक्या घरच्या हळदीचा टीळा लावू नको. हे वीरा तू तूझ्या बहिणीला दुसऱ्याच्या हातात देशील ? तू या लग्नाला स्वीकृती देशील ? हे वीरा मी या घराची

LBP PUBLICATION

लाडली आहे. परक्या व्यक्तीच्या हातात देण्याची ही साजीश होत आहे, तू वापस बस, परक्या घराच्या हळदीचा टिळा लावू नको. या विधीत भावाद्वारे वधूला हळदीचा टीळा लावला जातो, त्याला 'हळदीरो टीको' म्हणतात. या विधीमधील हळद विशेष करून वराकडील असते परंपरा नुसार भाऊ बहिणीच्या कपाळावर हळदीचा टीळा लावून विवाहाला संमती देण्याची प्रथा आहे. यावेळी नवरी मुलगी ऱ्हदयद्रावक ढावलो करते. उपस्थित सर्व महिलांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागतात. रडण्यातून जे गीत म्हटले जाते ते कठोर व्यक्तीच्या ऱ्हदयाला पाझर फोडते. या गीतातून करूणा, याचना, विनंती, आई वडीलांचे घर सोडताना होणारे दुःख मांडले जाते. हळदीचा टीळा लावू नये म्हणून बहिण भावाला विनवनी करते.

### १२) वायार हांगोळी

चार हाते चोडो रे वीरा, पाच हाते लांबो रे वीरा
पिळीया घडेला रे लोल, काडकाडे नक्षा रे वीरा
घालघाले घुगरा न वीरा, पिडीया घडला र लोल
पिडीया प बेसन बाई, नायन नावती रा लोल
काळेन कोटेरी भुगडी भातेरी, लाली लोवडी रा लोल
भीज जे वीरा भिजदरे,भीजागी बाईरी लाली लोवडी रा लोल
मत छोडो भावजो मारिए ज याडीरी हातेरी, दूध धाई वणासी पठडी हिय्याँ
मत छोडो याडी मारे वीरा रे हातेरी, शेरेरी मोलाई गरतणी हिय्याँ
मारी हुंसी भावजो रे हातेरी लटारी, वणासी पठडी मत छोडो याडी आँ हिय्याँ
मारी याडी रे हातेरो, लटा लटा नायो धोयो मातो
मत छोडोए भावेजो, मारे भावेजूरे हातेरो
आडी तेडी गुंतळीरो कस काडे मातो, मत छोडो ए भावजो.
मारे वीरारे हातेरो, सेरेजे पूणारो दामजे चुकायो मुठीयाँ,मत काडोएँ याडीओ,
मारे जावंळेरी हातेरी, दाणादाणा परोई परोई गरतळी, मत काडोळी याडीओ.

लग्नमंडपात नेण्याच्या वेळी आंघोळी घालताना नवरी मुलगी हे गीत म्हणते. नवरी मुलीला आंघोळी साठी पाटावर बसवितात. त्यावेळी इतर स्त्रीया, आई, वडील, भाऊ , बहिण नवरी मुलीला आंघोळ घालतात. त्यावेळी नवरी मुलगी ढावलो म्हणते. हेवीरा आईन दिलेली लाली लोवडी भिजली. ए भावजो माझ्या आईच्या हाताने केस केस धुतलेले केस सोडू नका.माझ्या भावजो च्या हाताने गुंफलेले कस काडून धुतलेले आडव्या तिडव्या गुंफणीचे केस सोडू नका. माझ्या नायक बापूच्या हाताचे पुण्याहून आणलेले पांढरे मुठीयाँ काढू नका. माझ्या वीराने पूण्याहून दाम देऊन घेतलेले मुठीयाँ काडू नका. माझ्या बहिणीच्या हाताने एक एक दाणा दाणा परोई गतरणी काढू नका. अशी विनवणी नवरी मुलगी आंघोळीच्या वेळी ढावलो मधून करते.

### मातो वावं जण

| | |
|---|---|
| यारे सीमा देखे भावज | झरेमरीया खिसेमा |
| परे सीमा देखे भावज | देखे भावज लिंबचंदनेरो कंगवा |
| देके मारे मारवाडी वीरारे | |

आंघोळी नंतर नवरी मुलीचे केस विंचारतावेळी नवरी मुलगी भावजला म्हणते माझ्या वीराच्या झरेमरीया खिशातून लिंब चंदनाचा कंगवा आण.असे गीतातून भाव व्यक्त करते.

### वेतडूर चोटीर पाणी पिणो

| | |
|---|---|
| घीए दुधेरी हांडी भरमेली | गंहू गोळेरी गुणी भरमलेली, |
| वेतडून दुबळो करमेली तोन सरम छेनी. | वेतडून दुबाळो करमेली, तोन सरम छेनी. |

तूप, दूध ची हांडी भरून आहे पण नवऱ्या मुलाला दुबळा केलय. तूला शरम नाही. गूळाची गुणी भरली आहे.नवऱ्या मुलाला दुबळा केलयं तुला शरम नाही.असे म्हणत व्यंग गीत गाऊन नवऱ्या मुलाला अंघोळ घालतात व नवऱ्या मुलाच्या चोटी वरून नवरी मुलीची आजी पाणी पिते.

### १३) डोरणं बांधेरो

सोना रे साखळेती बांधेतो न बंदाई वीरा

काचे जे धागाती बांधेतो बंधगीरे रे वीरा
पंचू रे हातेती बांधेतो बंधगी रे वीरा.

हे वीरा सोन्याच्या साखळीने बांधली तर नाही बांधल्या गेली पण कच्च्या धाग्याने पंचमंडळीच्या हाताने बांधली तर डोरणं बांधल्या गेली. मी माझे वचन पूर्ण करेन. माझी कुठलीही शिकायत येऊ देणार नाही.

### १४) वाया लगांळो

गोर बंजारा विवाह वडत्या गोत्र व्यक्तीद्वारा संपन्न करण्याची प्रथा होती परंतु बदलत्या काळानुसार जादा तर ठिकाणांवर ब्राम्हणाद्वारा ही विवाह करून घेतात.

### सप्तपदी

दोन मुसळ गाडले जातात. एक छोटा मुसळ व दुसरा मोठा मुसळ, गाडले जातात, कोडी इत्यादी साहित्य असतात.नवरा मुलगा व नवरी मुलगी मुसळाभोवती सात फेरे घेतात. यावेळी नवरी मुलगी सप्तपदी गाते.

याडी देके, बापू देके
नव लाकी जीवडा
लाजू भरए भावजो, आँ हियाँ
बिन घोरी जीवडा
घरेमा चालो भावजो आँ हिय्याँ
आवडा जलमाळो काजेक
किदिए नायकण याडी, आँ हिय्याँ

असे नवरी मुलगी म्हणत म्हणत सात फेरे घेते.

### सप्तपदी -

एक वेडा फरल बेटी पंचुरी
दुसरो वेडा फरल भेन भाईरी
तिसरो वेडा फरल नंणद भोजाईरी
चवथो वेडा फरल  टांडेरी नगरी
पाचवे वेडा फरल जोरू तमारी
छटो वेडा फरल लाडा तमारी
सातवो वेडा फरल वेतडू मारो.

प्रथम फेर मध्ये तांड्याच्या पंचांना स्मरते, दुसरा फेऱ्याना भाऊ बहिणीचे नाव घेते. तिसरा फेरा नणंद भावज ला स्मरूण घेते.चौथा फेरा तांडा नगरीला स्मरण करून घेते. पाचवा फेरा घेऊन मी जोरू बनले. सहावा फेरा घेऊन दुल्ह्याची प्यारी बनली. सातवा फेरा घेऊन वचन देते की, दुल्हा माझा झाला.

### १५) घुघरी बांधळों

मत घालो याडी घुघरी रं लोल
मत घालो मन झारली रं टोप
पराये पतीयार सोभा घालन
मन पराई मत करो याडी. आँ हिय्याँ

मला घुगरी ची लोल, झारलीची टोप तीची निशाणी घालून पराई करू नका.

### १६) नवलेरीन भार काडळों

मारो वीरेंळा हिय्याँ
मन अब कत मेलीची
मारो जनमेरो नातो तुटे लागो. आँ हिय्याँ
मन तमारे कळजे कनेती दूर मत मेलो रे वीरेंळा. मारे वीरेळांन

माझ्या वीरा मला आता कुठे ठेवतोस. माझ्या वीराला माझी अडचण झाली. माझ्या जन्माचे नाते तुटत आहे. मला तुमच्या काळजापासून दूर पाठवू नका.आँ हिय्या. नवरीला बाहेर काढतावेळी ती हे ढावले म्हणते.

### १७) हवेलीच्या अगोदरचे गीत

आदि आदि रातेरो बोले रे झारिया तितर
म बोले मारे नायक बापूरे गोद
बेटो मारो नायक बापू, समळे वचार रे,
उंडे उंडे खोळाम बोल रे झारिया तितर
बेटो मारो नायक बापू समळे वचार रे
तू एक बोल ए काळी कोवल
गंगा जमूना रे पेट
म एक बोलू ए काळी कोवल
मारी याडी रे गोद



LBP PUBLICATION

अर्ध्या अर्ध्या रात्री झारिया तितर बोलते तर मी माझ्या नायक बापूच्या कुशीत बोलते नायक बापू मला शिकवण देतो. विचार ऐकवतो. खोल खोल दरीत झारिया तितर बोलतय माझा नायक बापू मला शिकवण देतो.

तू काळी कोयल गंगा जमुनाच्या पोटी बोलते मी माझ्या आईच्या कुशीत बोलते.

मला रात्र रात्र झोप येत नाही. माझ्या आई वडिलांच्या कुशीत मी बोलते. माझे वडील मला विचार ऐकवितात, हवेलीच्या अगोदर नवरी मुलगी ढावलो मध्ये हे गीत म्हणते.

## १८) हवेली : बैलावर उभे राहून हवेली चे ढावलो म्हणणे.

डोळिया ला संबोधित करून रडत रडत गीत गाते -

एक तो घडी छूट जो रे मारे बापूरो डोळीया, आँ हिय्या |तू घडी भरो छुटजो रे बा,

तू छूटो तो झामरी झोलेरो खड खरा दूं
दूधिया तळाये पर पाळीं परादू
दोई सिंग सोने ती मंडादू,

तू ए छुटे मारे बापूरो खाडू
ए छुटो मार याडी रो झुरलो
ये घडी एक रासडीज तोडन धाराजो रे देजूवा मार

एक तो घडी सुटून जा माझ्या बापूच्या डोळीया. तू सुटला तर तुला झामरी झोलचे गवत खाऊ खालीन, दुधिया तळ्याचे पाणी पिऊ घालीन, दोन्ही सिंग सोन्याने मढविन, तू घडीभर सुटून जा माझ्या आई वडिलांच घर सुटत आहे. तू घडी एक रस्सी तोडून पळून जा.असे डोळीयाला पळून जाण्यासाठी आमिषे दाखविते, विनवणी करते.

## १९) हवेली -

हवेली ! ए आँ हिया
आचो खादी, आचो पीदी
ए मार नायक बापूरी हवेली
आचो खायेस, आचो पियेस
भरी भरी रियेस, मार बापूरी हवेली,आँ हिय्याँ
हवेली ऐ हिय्याँ
ए छूट मत जायेस ये
मारेज नायक बापेरी हवेली ||१||
हवेलीए गंगा जमूनारो नीरज हल्लोळो
लजुजे मारे जे नायक बापूरी
नगरी हालोळो लेस हवेली ||२||
हवेली, ए वडेलासू वदेस, लिंबडासू लेरेस
घुलरेसू फेलेस हवेली
हवेली ए ,हारीयाळीसी हारी भरी रेस ए हवेली ||३||
हवेलीए नवताड उँचीएँ, नवताड नीची हवेली,
हवेली ए हुबे जावूं तो हात न पूर हवेली
हवेली ए हेट बेसू तो हात न लाग ए हवेली ||४||
हवेली ए, उंचेरी खिडकी खोलू आनन धनेरी हवेली,
हवेलीए हेटेरी खिडकी खोलू तो सोने आन चांदीरी हवेली.
हवेली ए हटेरी खिडकी खोलू तो घीए न गोळे री हवेली.
हवेली ए, तारे राज आचो खादी आचो पिदी
मारे नायक बापूरी हवेली, आँ हिया ||५||
हवेली ए चांदा सूर्या रो जोडा
देत गेजू मारे नायक बापूरो जोडा तपाएस हवेली.
हवेली ए, मा कुंवार कनियारो आशीर्वाद हवेली, ऑ हिय्या ||६||
सीकद बापू सीक दरे
तारे सीकेन बापू बांधू छेवटीयारी गाठ
छेवटीया छूट जाए बापू, बांधू हिवडेरी गाठ ए हवेली ||७||
ए एडीर करू बापू बेडी रे
कडीयारी कमान रे
ये रांगो जू, नवजू नवीयूं
रूपो जू तप जू तपीयूं सूईरे नाके माईन नीकळीयू
तोबी तमन वोळम आये कोणी दू ये
मारे नायके बापूरी हवेली. आँ हिय्या ||८||
हवेली ए, आँ हिय्या

चांगले, खाल्ले, पिले, माझ्या नायक बापूची हवेली.चांगल खा पी नेहमी भरलेली रहा माझ्या नायक बापूची हवेली, तू सुटून जावू नकोस माझ्या नायक बापूची हवेली. हवेली गंगा यमुना चे पाणी हल्लोळो घेते तसं नगरी हल्लोळो घे.हवेली वडासारखी वाढ, लिंबासारखी झ ोका घे, उंबारासारखी फैल, आणि हिरव्या गवतासारखी हिरवागार भरलेली रहा हवेली. हवेली तू नव ताड उंच व नवताड खाली आहेस मी उभा राहिली तर हात पूरत नाही, खाली बसली तर हात लागत नाही. हवेली वरची खिडली खोलकी तर अन्नधान्य, धनाची हवेली, खालची खिडकी खोलली तर सोने अनू चांदीची हवेली आणि तूप अन गुळाची हवेली, माझ्या नायक बापूची हवेली.

नटलेली सजलेली, कडीया देख पेरी अन उभना देख ओढी चंद्राची शितल छाया व सुर्यतेज अखंड देत राहत, तसं माझ्या नायक बापूच जोडा चंद्र सूर्यासारखा तेजोमय ठेव. हा मी कुंवारी कन्या आशीर्वाद देत आहे. बापू तू मला शिकवण दे तुझी शिकवण छेवटीयारी गाठेनी बांधेन. छेवटीयारी गाठ सुटू शकते. मी माझ्या ऱ्हदयाच्या गाठीने बांधेन ए हवेली. बापू,माझ्या एडीची बेडी करेन, कंबरेची कमान करेन.जसं राबवतेल तसं राबेन. जशी वाकवितेल तशी वाकेन, चांदी जशी तपते तशी तपेन, सुईच्या नोकातून निघेन, तरी तुम्हाला माझी शिकायत येऊ देणार नाही, माझ्या नायक बापूची हवेली. ये हिय्याँ.बैलावर उभा राहून सुरूवातीला उत्तरेकडे तोंड करून नंतर मागे, त्यानंतर घराकडे व त्यानंतर ज्या रस्त्याने जायचे त्या रस्त्याकडे तोंड करून हवेली चे ढावलो म्हणते आणि तांदूळ पाठीमागे टाकते या हवेली मधून नवरी मुलगी

एवढे ऱ्हदयद्रावक गाते की भल्या भल्याच्या काळजाला पाझर फुटेल. अक्षरशः त्या बैलाच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागतात. मार अडचण हिये लाग.

**२०) हवेली नंतर तांगडी वाट लावताना**

मत घालीये भावेजो माळ वीरा लोल, आँ हिय्या
घुगरी ओ टोप मत लावो रे विरेंणा
मत खोलोए याडीओ सनारे घरेरी तारी तिपे गड र लोल.

भावज मला घुगरी टोप घालू नका,हे आयोंनो माझ्या वीराने आणलेली माळ काढू नका. हे वीरा तू सोनाराच्या घरीहून तिपे आणू नको.

**२१) जातेवेळी गळो पकडन ढावलो**
**याडीर गळो पकडन ढावलो**

याडी, याडी ए, हंसी हावलारी जोडी जसी, आपळों माँ बेटी री जोडी, याडी ये आँ हिय्याँ
आपली जोडीम ईचड्या पडेरी, वेळा जाए नायकणें याडी हिय्याँ,याडी ए आँ हिय्या
चांदा सूरयारी जोडी जू, माँ बेटीरी जोडी हिय्या,
किडी मुंगी सपाती जू तमार बेटी कोणी सपात्ती,
लिंबू नारळ वकजाव जू तमारी बेटी वकचाली याडी आँ हिय्या
काळो कुंडो निरमळ भरो, वोम कोर जाळा नाको
जाळेमाई नानी मोरी माचळी फंदागी, जू तारी बेटी फंदागी याडी. आँ हिय्याँ

हे आई हंस - हावलाच्या जोडी सारखी आपली माँ बेटीची जोडी आहे. या जोडी ईचड्या पडायची वेळ आली. चंद्र सूर्या सारखी माँ बेटीची जोडी आहे. किडी मुंगी सपातली नाही तशी तुमची बेटी तुम्हाला सपातली नाही. लिंबू नारळ विकावं तस तुमची बेटी विकली गेली. हे आई काळी कुंड मध्ये निर्मळ जल भरलेल आहे. त्यात जाळ टाकून लहान मोठे मासे अडकले. तशी तुमची बेटी या जाळात अडकली आई. ऑ हिय्याँ

**बापूर गळो पकडन ढावलो :**

नायक बाबल, घडी ए कागदेरी पूडीज करन तारे पगडी रे पेचेम घालेन गोकलरे नायक बाबल, आँ हिय्या.
कती जाऊं तो आट दनेती पंदर दनेर, छुटी कोणी दिनो, बापू रे आँ हिय्याँ
जनमेरी छुटी काडन, पराये पतियार, रसता कू झला दिनो, आँ हिय्याँ
सीकद बापू सीक द रे, तारी सीकोन बांदू छेवटियारी गाँठ
छेवटिया छूट जाए, बापू बांधू हिवडेरी गाठ,
नीली लकडी नव जू नवीयू, रूपो जू तपजू तपीयूँ
सुई रे नाके माईती निकळीयूँ, तोबी तमन वोळम आये कोणी दूँ,
मारे नायक बापू आँ हिय्या

हे नायक बाबल घडी एक कागदाची पूडी करून तुमच्या पगडीच्या पेचात जशी ठेवता तस मला लपवून टाका. कोठे गेले तर मला आठ, पंधरा दिवसाची सुट्टी दिली नाही. माझ्या जन्माची सुट्टी काढून पराए पतीच्या घरी मला कस देवून टाकलात.ए बापू मला शिकवण दे. तुझी शिकवण छेवटियाच्या गाठीने बांधेन छेवटियाची गाठ सुटू शकते. मी माझ्या ऱ्हदयाच्या गाठीने बांधेन. ओली काठी जशी वाकते तशी वाकेन. चांदी जशी तपते तशी तपेन. सूईच्या नाकातून निघेन. तरीही माझी शिकायत तुम्हाला येऊ देणार नाही. माझे नायक बापू.

भाईरं गळो पकडन ढावलो
वीरा रे कडभरी पारी, डुंगाभरी झमरली रे मारवाडी वीरा.
वाटेन पांनजे खावसतो लालीज बत्तीसी खल वीरा
वाटेन चालस तो वाटेडी खल देशमुख वीरा
खंडीम काकरा सपातो, जू तारी भेनडे कोणी सपाती वीरा
केळाज केवडेरो झूंड जसो आपळों झूंड वीरा.
तमारे झूंड जे माईती काजे टाळ काडे वीरा

घी ए गोळेरी माकी टाळे काड जू, काजे टाळ काडे वीरा आँ हिय्याँ,
तारी भेनड छं करन, वळ वाटेन, सुद वाट करन,
सो कोसेन, कोस समजन, सात समुदरेन पार करन
तारी भेनडेर खबर लेन आयेस वीरा आँ हिय्याँ,
आपनी भेनेती टाळो मत खाजो रे वीरेंळा आँ हिय्याँ

हे वीरा कडभरी पारी, डूंगाभरी झमरकी घालून वाटेने पान खालास तर लाल बत्तीशी शोभते. वाटेन चाललास तर वाटेडी शोभते खंडीत खडे सपातळे नाही तशी तुझी बहीण सपातली नाही. तुमच्या झूंडीमधून मला का टाकून काढलात. तूप गूळाला चिकटलेली माशी टाळून काढलं जस मला टाळून काढलात. तूमची बहीण आहे म्हणून वाकड्या वाटेला सरळ करून, शंभर कोसला एक कोस समजून, सात समुद्र पार करून तूझ्या बहीणीची खबर घ्यायला ये. आपल्या बहीणीला टाळू नकोस.

### भेणेरो गळो पकडन ढावलो

जावळींए जावळींए, चाला तो पटारभरी सीवां तो सादरी भरी जावंळ
बेसा तो पटारभरी जांवळ आँ हिय्याँ
घुगरा री जोडी जसत आपंळी जोडी ए जावंळ
आपणें जोडीम ईचड्या पडेरी वेळाज हेगी जांवळ

हे माझ्या बहीण, आपण चालतो तर पटार भरून, झोपतो तर सादरी भरून, बसतो तर पटार भरून, घुंगराची जोडी जशी शोभते तशी आपली जोडी आहे. आपल्या जोडीत ईचड्या पडायची वेळ आलेली आहे.

### निष्कर्ष :

गोरबंजारा समाजातील विवाह संस्कारातील लोकगीते ही प्राचीन कालीन आहेत. या लोकगीतामध्ये आशयाची खोली, अलंकार प्रचुरता, अनुप्रास प्राप्यता, प्रतिमासृष्टी, भाव सौंदर्य, अभिव्यक्ती, शब्दांना चपलखपणे कलाटणी देण्याची पध्दत, ठसकेबाजपणा, लालित्य, माधुर्य, अभिव्यक्ती सौंदर्य, आशयसौंदर्य इत्यादी गुण ठासून भरलेले आहेत. प्राचीन गोर बंजारा संस्कृतीची जीवनशैली, विवाह संस्काराच्या पध्दती, विवाहातील विधी, ज्ञान होते. लोकगीतांमध्ये हास्य, व्यंग, करूणा रस यातील लोकगीते यांचे उच्च दर्जाचा आहे. करूणा रस तर एवढा उच्च दर्जाचा आहे की नवरी मुलगी ज्यावेळी वायार हांगोळी, हळदीर टिको, हवेली मधून ढावलो म्हणते त्यावेळी मोठमोठ्यांच्या ऱ्हदयाला पाझर फुटतो व डोळ्यातून अश्रू वाहू लागतात. नवरी मुलगी तिच्या मनातील भाव उत्कटपणे मांडते.घोटा ही विवाह संस्कारातील प्रथम विधी असून कूंवारे मुले खसखस, सौंप, काली मिर्च, गूळ काठवटमध्ये ठेवून ढाकणीने घोटा घोळतात. घोटा घोळताना, हास्यात्मक, व व्यंगात्मक गीतातून उपस्थितांचे मनोरंजन करतात. वदाई विधी पार पाडताना गुरूबाबाचा मंत्र ७ वेळेस उच्चारून नवरा मुलगा व त्याचा लहान भाऊ याला वदाई डाग दिला जातो. वेतडू आव जण नवरी मुलगी जे गीत म्हणते त्यात करूणा रस, चिंता, संकटाचे भाव व्यक्त होतो. काळ्या कुंडात निर्मळ जल आहे. त्यात जाळ टाकलयं आणि त्यामध्ये लहान मोठे मासे अडकल्या गेले तशी तुझी बेटी अडकली. काळया शेतात सरळ, वाकड्या तिकड्या बाभळी आहे. त्यात बाभळीला काळे, पिवळे फूल लागले. हे फूल गळून पडले आणि कोमजत आहे, तशी तूझी बेटी कोमेजली, झूरत आहे. अशा भावना करूणारसातून व्यक्त करते. टिको लगाडेरो विधीत नवरी मुलगी ढावलो मधून परक्या घरच्या हळदीचा टिळा लावून मला परकी करू नको म्हणून भावाला विनवणी करते. शंभर हाक मारते तेव्हा भाऊ येत नाही पण आज एकाच हाकेत आला. डोक्यावर मंदिल, गळ्यातील लाकीट कबूल करते अशी आमिषे देते आणि हात जोडून अरदास करते, तूला भीक मागते पण तू या घडीला वापस बस. असे ढावलो मधून करूणारस उत्पन्न करते. यावेळी उपस्थितांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागतात. डोरणं बांधेरो विधीत नवरी मुलगी वीराला म्हणते सोन्याच्या साखळीने बांधली तर बांधल्या गेली नाही पंचमंडळीच्या हाताने कच्या धाग्याने बांधल्या गेली. मी माझे वचन पूर्ण करेन. तुम्हाला माझी कुठलीही शिकायत येऊ देणार नाही असा विश्वास देते.घुघरी बांधणो विधीतून घुघरीची लोल, झारलीची टोप, गळयातील तिपे पतीची निशाणी घालून मला पराई करू नका. असे करूणा रस ढावलो मधून व्यक्त करते. या वस्तू सिंधू संस्कृतीतील हडप्पा व मोहेंजोदारो येथे सापडल्या आहे. गोर बंजारा संस्कृती येथील मूळ बासिंदे आहे. हडप्पा नगरी व मोहना नगरीला हे हवेली (नगरी) चे मूळ आहे. हवेली ए, मी चांगले खाल्ले, पिले, हवेली तू वडासारखी वाढ, लिंबासारखी झोका घे, उंबरासारखी फैल आणि हिरव्यागार गवतासारखी भरलेली रहा. हवेली ही अन्नघान्याने भरलेली, सोने, चांदी, दूध, तूप, गूळ मुबलक आहे. ही कुंवारी कन्या आशीर्वाद देत आहे. बापू, तू मला शिकवण दे, तूझी शिकवण मी ऱ्हदयाच्या गाठीन` बांधीन. जसे राबवतेल तशी राबीन, जशी वाकवतेल तशी वाकीन, चांदी तपते तशी तपेन, सूईच्या नोकातून निघेन, पण माझी शिकायत येऊ देणार नाही. असे वचन देते. गोरबंजारा समाजातील विवाह संस्कारातील लोकगीत, ढावलो मध्ये करूणा रस उच्च दर्जाचा असून भल्या भल्याच्या कठोर काळजाला पाझर फुटतो. उपस्थितांच्या डोळ्यातून अश्र वाहू लागतात. नवरी मुलीच्या मनातील भाव, आई वडीलांचे घर सोडताना झालेले दु:ख प्रगट होते. विवाहसंस्कारातील विधीत प्रामुख्याने सर्ववेळी लोकगीत गायले जाते. गोरबंजारा

समाजातील लोकगीतांची फार प्राचीन परंपरा आहे. यामधून प्राचीन संस्कृतीचे दर्शन घडते. लोकगीतांच्या माध्यमातून गोर बंजारा समाजाचा इतिहास जिवंत आहे.

**संदर्भ :-**


१) आत्माराम कनिराम राठोड (२००६), गोरवट, साहित्य अकादमी, रवींद्रभवन, नवी दिल्ली.
२) कै.बळीराम हिरामन पाटील (१९३६), गोर बंजारे लोकांचा इतिहास, प्रकाशक कै.बळीराम हिरामन पाटील, स्मारक समिती, यवतमाळ
३) डॉ.गणपत राठोड (२००२), बंजारा लोकगीतों का सांस्कृतिक अध्ययन, चंद्रलोक प्रकाशन, कानपूर
४) प्रा.डॉ.रूक्मिणी पवार (२००५), बंजारा लोकजीवन पध्दती, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद
५) मुलाखत, गीताबाई गणपत चव्हाण, राहणार पायटंगी तांडा, जिवनापूर पो.उमरी ता.माजलगाव जि.बीड
६) मुलाखत, भगवान रावजी जाधव, राहणार रेखानाईक तांडा पो.नित्रुड ता.माजलगाव जि.बीड
७) मुलाखत, अलका राजकुमार राठोड, राहणार रेखानाईक तांडा पो.नित्रुड ता.माजलगाव जि.बीड


LBP PUBLICATION